पुणे, वर्ष २, अंक ९
ऑगस्ट २०१२ | ₹३०

# अर्थपूर्ण

आर्थिक साक्षरता + पारदर्शकता = स्वाभिमानी भारत



## वर सुटाबुटात खाली दारिद्र्यात भारतीय समाजाची नामुष्की

## गुंतवणुकीचे नवे मार्ग

## ‘ई-पेमेंट : आर्थिक व्यवहारांना सुरक्षितता

## आणि

## उत्तराच्या दिशेने समर्पण यात्रा

# अर्थपूर्ण

ऑगस्ट २०१२

वर्ष दुसरे
अंक नववा

वार्षिक वर्गणी
३०० रुपये

पुण्याबाहेरील धनादेश
३५० रुपये

धनादेश 'अर्थपूर्ण पब्लिकेशन्स प्रा. लि.'/ 'Artahapurna Publications Pvt. Ltd.' या नावाने काढावा.

**डिझाईन**
ऑफबीट कॉन्सेप्ट्स,
नारायण पेठ, पुणे. ९८८१०९८०१०
**मुखपृष्ठ :** प्रशांत काळे
**मुद्रितशोधन :** विजय जोशी

**यापूर्वीचा अंक पाहा**
www.epapergallery.com
/Arthpurna/index.htm



'अर्थपूर्ण'मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या साहित्य आणि विचारांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

**जाहिरात प्रसिद्धीसाठी संपर्क**
**वि. प्र. जोशी:** ९५५२७४२१००
**पुष्कराज खांडेकर:** ९८२३०५०३०२
**रमेश कोंडलकर:** (मराठवाडा जाहिरात प्रतिनिधी) ९४२२२५५५०५, ९३७३५८७५५५






संपादक
**यमाजी मालकर**
**संपादन साहाय्य : सम्राट शिरवळकर**

**अर्थपूर्ण पब्लिकेशन्स प्रा. लि.**
सी-६, हरिस्मृती, आयडीबीआय बँकेच्या मागे,
मेहंदळे गॅरेज रस्ता, एरंडवणे, पुणे-४११००४
**संपर्क : ०२०-३२६००९९६**
www.arthapurna.org


# अनुक्रमणिका


०४ **पैसा, पाणी आणि वीज...** यमाजी मालकर

०६ **साहेब, हे कशात बसवायचं...?...**कल्याण टांकसाळे

०९ **बँकांनी केलेली दिशाभूल...**सुधीर राव

१२ **विकासासाठी निर्बंध आणि नियंत्रण**...जयंत मराठे

१४ **उत्तराच्या दिशेने समर्पण यात्रा**

१६ **पाणी टंचाई : एक आनंददायी समस्या!**...डॉ. रवी तांबोळी

२० **अतिक्रमण**...प्रसाद मिरासदार

२१ **स्वस्त शैक्षणिक कर्ज**...आरूष

२२ **लिक्वीड फंड सर्वोत्तम गुंतवणूक**...सदानंद ठाकूर

२४ **नवीन गुंतवणुकीचा पर्याय : एफ.एम.पी.**...अंजली झरकर

२६ **'ई-पेमेंट'मुळे आर्थिक व्यवहारांना लाभणार सुरक्षितता!**...यशराज

२८ **चेकला सरस पर्याय - ई-पेमेंट...** वंदना धर्माधिकारी

३० **बँकांची आर्थिक माहिती सुरक्षा आणि कायदा...**ॲड. डॉ. सुनील गोखले

३२ **भांडवली बाजार आहे का फायद्याचा?...** राहुल खांडेकर

३४ **विमा पॉलिसी आणि पहिला प्याला...**विजय तरवडे



'अर्थपूर्ण' हे मासिक मालक, अर्थपूर्ण पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्याकरिता **मुद्रक व प्रकाशक सुधीर राव** यांनी विक्रम प्रिंटर्स प्रा. लि. ३१,३४ पर्वती इंडस्ट्रीयल इस्टेट, पुणे-सातारा रस्ता, पुणे ९ येथे छापून ६, राजप्रसाद, १०८ तुळशीबाग कॉलनी, पर्वती, पुणे-४११००९ येथे प्रसिद्ध केले.
**संपादक : यमाजी मालकर**

# पैसा, पाणी आणि वीज



यमाजी मालकर
ymalkar@gmail.com

**अर्थशास्त्र असे सांगते की भांडवलाला खेळते ठेवले पाहिजे. ते १०००, ५०० आणि १०० च्या नोटांमध्ये कोंबून ठेवून चालणार नाही. सोन्यासारख्या अनुत्पादक धातूत प्रमाणापेक्षा जास्त गुंतवून चालणार नाही. निम्मी-अधिक जनता रोखीचाच व्यवहार करते, हे परवडणारे नाही. सरकारची तिजोरी चांगल्या मार्गाने भरल्याशिवाय पायाभूत सुविधा सुधारणार नाही आणि राजकारणाला शुद्ध पैसा वापरायला दिल्याशिवाय ते भ्रष्टाचारमुक्त होणार नाही.**

दैनंदिन जीवन जगताना ज्या अत्यावश्यक साधनसंपत्तीचा विचार केल्याशिवाय आम्ही आज जगूच शकणार नाही, अशा पैसा, पाणी आणि विजेचा वापर आज देशात कसा चालला आहे, हे पाहिल्यावर आपण समाज म्हणून किती नालायक आहोत, हे लक्षात येते. गेल्या महिन्यातील यासंबंधीच्या तीन घटनांनी आपल्या समाजातील विसंगती पुन्हा एकदा लक्षात आणून दिली.

गेल्या २०-२५ वर्षांत जगाला असे वळण मिळाले की आमचे श्रम आणि जगाची गरज जुळली आणि त्यापूर्वी कधी आला नव्हता एवढा पैसा देशात आला. परकीय चलनाची गंगाजळी भरली. आमच्या कंपन्यांचे नफे वाढले. भारतीय कंपन्यांनी परदेशातील कंपन्या ताब्यात घेण्यास सुरवात केली. जीडीपी वाढला. १२१ कोटींमध्ये असलेला मध्यमवर्ग ३० कोटींच्या घरात गेला. लाखो नागरिकांची स्वत:ची घरे झाली आणि घरांसमोर मोटारी उभ्या राहू लागल्या. पैसे खर्च करणारा पर्यटक म्हणून भारतीय पर्यटकाला जगभर पायघड्या घातल्या जाऊ लागल्या. एवढ्या साऱ्या समृद्धीत भारतीय माणूस आज सुखी आहे काय, या प्रश्नाचे उत्तर विचारले तर ते मात्र नकारार्थी येते. त्याचे कारण आपल्या हाताबाहेरचे असते तर ते समजण्यासारखे होते. मात्र कारण आहे ते अगदीच तांत्रिक. आमच्या देशात प्रचंड पैसा आहे, मात्र भांडवल नाही. प्रचंड कॅश आहे, मात्र बँकमनी नाही. प्रचंड म्हणजे किती असावे, तर २१,००० टन सोने आहे, मात्र व्यापारउदीम आणि रोजगार वाढविण्यासाठीचे भांडवल नाही. म्हणजे जगातील सुमारे ११ टक्के सोने असणारा हा देश आज परकीय गुंतवणुकीसाठी जगाकडे भीक मागतो आहे. (आता तरी जनतेने भांडवलवृद्धीस प्रोत्साहन देणाऱ्या योजनांमध्ये गुंतवणूक करावी, असे पंतप्रधान मनमोहनसिंग यांना आवाहन करावे लागले आहे.) स्वत:चे सार्वभौमत्व गहाण ठेवण्याची वेळ आली तरी परकीय गुंतवणुकीला नकार देण्याची हिंमत आज आमच्याकडे राहिलेली नाही. अर्थशास्त्र असे सांगते की भांडवलाला खेळते ठेवले पाहिजे. ते १०००, ५०० आणि १०० च्या नोटांमध्ये कोंबून ठेवून चालणार नाही. सोन्यासारख्या अनुत्पादक धातूत प्रमाणापेक्षा जास्त गुंतवून चालणार नाही. निम्मी-अधिक जनता रोखीचाच व्यवहार करते, हे परवडणारे नाही. सरकारची तिजोरी चांगल्या मार्गाने भरल्याशिवाय पायाभूत सुविधा सुधारणार नाही आणि राजकारणाला शुद्ध पैसा वापरायला दिल्याशिवाय ते भ्रष्टाचारमुक्त होणार नाही. सगळीकडे संबंध कशाचा आहे पाहा. फक्त पैशांच्या नियोजनाचा. पण तेच आम्ही करायला तयार नाही.

पाण्याशिवाय तर आम्ही जगूच शकत नाही. मात्र त्याच्या नियोजनातही आम्ही किती गोंधळ घालून ठेवला आहे पहा. हे उदहारण आहे, सातारा जिल्ह्यातील मलकापूर गावचे. पाच वर्षांपूर्वी पाणी-प्रश्नावरून परेशान असलेल्या या गावात आज २४ तास

नळाला पाणी येते. मलकापूरच्या या प्रयोगाचे एकच कळीचे गुपित आहे. टंचाईच्या काळात माणूस अतिशय असुरक्षित होतो आणि मिळेल तेवढे ओरबाडून घेतो. कारण ती वस्तू, सुविधा त्याला परत मिळण्याची खात्री नसते. आज महाराष्ट्रात पाण्याच्या टंचाईचे तेच झाले आहे. पाणी कमी उपलब्ध आहे, ही वस्तुस्थिती आहे, मात्र नियोजन केले तर ते सर्वांना पुरून उरू शकते. कोणत्याही गावात किंवा शहरात गेलात आणि तेथील पाणीप्रश्नाविषयी कोणाला विचारले तर त्याचे उत्तर ठरलेले असते. पाणी भरपूर आहे हो, मात्र त्याचे नियोजन नाही. त्याचे नियोजन कोण करणार, या प्रश्नाला मात्र कोणाकडेच उत्तर नसते. ते उत्तर मलकापूरने दिले. मलकापूरने आधी पाणी विकत घेण्याची मानसिक तयारी केली. त्यानुसार सर्व घरांमध्ये पाणीमीटरचा वापर सुरु केला. नव्या तंत्रज्ञानाच्या वापराने सर्व व्यवस्था स्वयंचलित केली. 'प्रेशर मॉनिटर' मुळे पाण्याच्या प्रेशरचे नियंत्रण करण्यात आले. 'अधिक पाणीवापर अधिक पाणी दर' हे सूत्र सर्वांनी मान्य केले. आणि आश्चर्य म्हणजे २४ तास पाणी उपलब्ध असल्याने पाण्याचा वापर ३० टक्यांनी कमी झाल्याचे सिद्ध झाले. मीटर पद्धतीमध्ये पाणी महाग होते, हा गैरसमजही दूर झाला. ७० टक्के गावकऱ्यांना दरमहा १०० रुपये बील देवून २४ तास पाणी मिळाले. परिणाम असा झाला की मलकापूरची लोकसंख्या ५ वर्षांत २३४ टक्क्यांनी वाढली. कारण बाहेर सगळीकडेच नियोजनाचा पत्ता नसल्याने पाणी असूनही पाण्यासाठी वणवण चाललेली आहे. प्रश्न पाण्याच्या नियोजनाचा आहे, पण आज ते आम्ही करायला तयार नाही.

आता तिसऱ्या जीवनावश्यक गरजेतही आम्ही काय करतो आहोत, पहा. वीजपुरवठ्याशिवाय आपले पान हलत नाही, मात्र ती मौल्यवान आहे. कारण ती पाणी, कोळसा, गॅस, वारा, सूर्यप्रकाश अशा नैसर्गिक साधनांपासून तयार होते. तिचे रूपांतर करण्यासाठी बरेच सोपस्कार आणि खर्चही करावा लागतो. तिचा वापर चांगल्या पद्धतीने केला तर काय होऊ शकते, हे सातारा जिल्ह्यातील वितरण कंपनीने दाखवून दिले आहे.

सातारा जिल्हा १ जानेवारी २०१२ रोजी भारनियमनमुक्त झाला. ३० जूनअखेर साताऱ्याचे अधीक्षक अभियंता असलेल्या गोरखनाथ चव्हाण या अधिकाऱ्याने ही किमया करून दाखवली आहे. तीन वर्षांपूर्वी सातारा जिल्ह्यात रुजू झाल्यावर त्यांनी वीज चोरी रोखण्याचा आणि बिल वसुलीचा धडाकाच लावला. जेथे सर्वाधिक वीज गळती होते, त्या कृषी पंपांना कनेक्शन देण्याची योजना त्यांनी जाहीर केली. परिणाम असा झाला की, १२ वर्षांचा बॅकलॉग म्हणजे ७ हजार ५०० ची प्रतीक्षा यादी एका वर्षात संपली. कनेक्शन मिळतच नाही, हे पाहून नवी मागणी केली जात नव्हती. मात्र, प्रतीक्षा यादी संपल्याने आणखी ८ हजार शेतकऱ्यांनी अर्ज केले. वीज नसेल तर देणार कोठून, असा अनेकांचा अशा वेळी प्रश्न असतो. मात्र, चव्हाण यांनी त्याची तरतूद करून ठेवली होती. सातारा जिल्ह्यात पाच विभाग आहेत. वीज गळती आणि उत्पन्न यानुसार अ, ब, क अशी ही विभागणी केली जाते. 'अ' विभागात भारनियमन केले जात नाही, मात्र 'ब' आणि 'क' विभागाला ते सहन करावेच लागते. वीज ग्राहक, वीज कर्मचारी आणि वीज कंपनीचे नियम यांची चव्हाण यांनी अशी सकारात्मक मोट घातली की, सातारा जिल्ह्यातील विभागांचा दर्जा सतत सुधारत गेला आणि आपोआपच जिल्हा भारनियमनमुक्त होत गेला. वीज वितरणातील गळती हे वीज समस्या गंभीर होण्याचे सर्वाधिक महत्त्वाचे कारण आहे. कॅपॅसिटर बसवून आणि आकडे टाकणाऱ्यांना अधिकृत वीज कनेक्शन देऊन त्यांनी बचत तर केलीच; पण वीज चोरी करण्याचे कारणच काढून टाकले.




चव्हाण यांचे हे यश तीन कारणांनी महत्त्वाचे आहे १) वीज गळतीचे प्रमाण २४ टक्क्यांवरून १५ टक्क्यांवर येऊ शकते, हे सिद्ध झाले. २) सातारा जिल्ह्यासाठी वेगळी काही तरतूद नसताना हे झाले, याचा अर्थ हे यश कोठेही मिळू शकते. त्यासाठी राजकीय वरदहस्त, विशेष सामग्री यापैकी कशाची गरज नाही, हेही समोर आले. ३) २००८-२००९ मध्ये ३३८ कोटी उत्पन्न असलेल्या सातारा जिल्ह्याचे उत्पन्न ६३८ कोटींवर पोहोचले, याचा अर्थ चांगली सेवा मिळाल्यास लोक त्याची किंमत मोजायला तयार आहेत, हेही आकडेवारीने सिद्ध झाले.

जीवनावश्यक तीन गरजांची तुलना येथे यासाठी केली की या गरजा भागत नसल्याने आमच्यावर कमी दर्जाचे जीवन जगण्याची वेळ आली आहे. एकीकडे आम्हाला सुटाबुटाची ऐट हवी आहे, तर दुसरीकडे आमचे वर्तन अनेक दिवसांपासून उपाशी असलेल्या माणसासारखे आहे. त्यात बदल न झाल्यास आणि त्याच्या वाटपाची समन्यायी व्यवस्था न केल्यास नुसती साधनसंपत्ती वाढून काहीच उपयोग होत नाही, याचा अनुभव आज आपण घेत आहोत. ■